खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### मराठी विभाग : पुस्तक वाटप उपक्रम

पुढारी

# जगण्याला ग्रंथधर्माचे अधिष्ठान द्या : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

वैचारिक समृद्धतेसाठी ग्रंथांची भूमिका मोलाची असून, विद्यार्थ्यांसह सर्वांनीच आपापल्या जगण्याला ग्रंथधर्माचे अधिष्ठान द्यायला हवे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते. यात सुमारे १७० विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देण्यात आले.



ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील विद्यार्थिनीस पुस्तक देण्यात आले.

या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.

**हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात १७० विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप**

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की, पुस्तकांच्या वाचनातून नवे सूचने, नवे कळणे चालू राहते. त्यामुळे माणूस आतून फुलून येतो. त्यामुळे ग्रंथांचा परिसस्पर्श आपल्या आयुष्यात व्हावा असे ते म्हणाले. त्यांनी मराठी विभागाच्या वतीने दरवर्षी राबविण्यात येत असलेल्या पुस्तक भेट उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला.

संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना वाचन संस्कार रुजविण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक करताना डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड रुजावी, यासाठी पुस्तक भेट उपक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. एम.ए. मराठीची विद्यार्थिनी प्रतीक्षा खराडे या राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) ज्युनिअर रिसर्च फेलोशिपसह (जेआरएफ) उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने कौतुक करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी केले, तर डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Aug 5, 2023 Page No. 7

लोकमत



पुस्तक भेट उपक्रमात दिव्या पिंगळे हिला पुस्तक भेट देताना संस्थाध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील.

Hello Pune Gramin
Page No. 4 Aug 05, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

# जगण्याला ग्रंथधर्माचे अधिष्ठान द्या : बुट्टे पाटील

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पुस्तक भेट कार्यक्रम उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** वैचारिक समृद्धतेसाठी ग्रंथांची भूमिका मोलाची असून विद्यार्थ्यांसह सर्वांनीच आपापल्या जगण्याला ग्रंथधर्माचे अधिष्ठान द्यायला हवे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते. यात सुमारे १७० विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देण्यात आले. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना वाचन संस्कार रुजविण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक करताना डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी पुस्तक भेट उपक्रमाचे आयोजन केल्याचे सांगितले. एम. ए. मराठीची विद्यार्थिनी प्रतीक्षा खराडे या राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) ज्युनिअर रिसर्च फेलोशिपसह (जेआरएफ) उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचे संस्थेच्या वतीने कौतुक करण्यात आले. डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Aug 05, 2023
Powered by: erelego.com

Rashtrsanchar-0...

iffied | 05•08•2023
BREAKING NEWS AND MORE

# जगण्याला ग्रंथधर्माचे अधिष्ठान द्या - ॲड. बुट्टे पाटील



**राजगुरुनगर :** वैचारिक समृद्धतेसाठी ग्रंथांची भूमिका मोलाची असून विद्यार्थ्यांसह सर्वांनीच आपापल्या जगण्याला ग्रंथधर्माचे अधिष्ठान द्यायला हवे, असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने वाचन संस्कृतीच्या प्रसारासाठी आयोजित पुस्तक भेट कार्यक्रमात बोलत होते. यात सुमारे १७० विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देण्यात आले.

याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ.व्ही.डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते.

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील पुढे म्हणाले की पुस्तकांच्या वाचनातून नवे सूचने, नवे कळणे चालू राहते. त्यामुळे माणूस आतून फुलून येतो. म्हणून ग्रंथांचा परिसस्पर्श आपल्या आयुष्यात व्हावा असे ते म्हणाले.

त्यांनी मराठी विभागाच्या वतीने दरवर्षी राबविण्यात येत असलेल्या पुस्तक भेट उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला.

संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना वाचन संस्कार रुजविण्याचे आवाहन केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**